# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.11.2025** **वारःशनिवार**

---

1. राष्ट्राच्या कल्याणासाठी स्वदेशी, योगाभ्यासासह नऊ निर्धार करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
2. नक्षलवादी अनंत उर्फ विकास नागपुरेसह दरेकसा दलमच्या 11 जहाल नक्षलवाद्यांची गोंदिया पोलिसांकडे शरणागती
3. 2026-27 साठी आंतरराष्ट्रीय सागरी संघटना अर्थात IMO च्या परिषदेवर भारताची सर्वाधिक मतांसह पुन्हा निवड आणि
4. पुरुष कनिष्ठ हॉकी विश्वचषक 2025 स्पर्धेत भारताचा चिलीवर 7-0 असा विजय

**<u>पंतप्रधान-उडुपी</u>**

राष्ट्राच्या कल्याणासाठी नऊ निर्धार करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. कर्नाटकातील उडुपी इथल्या श्री कृष्ण मठात ते काल बोलत होते. नदीचं रक्षण, नैसर्गिक शेती, स्वदेशीचा वापर, योगाभ्यास, भरडधान्याचा आहारात समावेश, तेलाचा वापर कमी करणे इत्यादींचा या निर्धारांमध्ये समावेश आहे. केंद्र सरकारच्या अनेक उपक्रमांची प्रेरणा भगवद्गीतेतून घेतल्याचा पंतप्रधानांनी उल्लेख केला. यावेळी श्री कृष्ण मठात झालेल्या गीता पारायणात पंतप्रधान सहभागी झाले होते. पंतप्रधान काल गोव्यातील श्री संस्थान गोकर्ण पर्तगाली जीवोत्तम मठाच्या सार्ध पंचशत महोत्सवातदेखील सहभागी झाले होते. यावेळी पर्तगाली इथल्या प्रभू श्री रामांच्या 77 फूट उंच पुतळ्याचं अनावरण आणि उद्यान तसंच संग्रहालयाचं उद्घाटन मोदी यांनी केलं.

**<u>पंतप्रधान-अमित शहा</u>**

छत्तीसगडमधील रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलिस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आणि उद्या उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या विविध सत्रांचे अध्यक्षस्थान ते भूषवतील तसंच पंतप्रधानांच्या हस्ते विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदक प्रदान केले जातील. दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल या अखिल भारतीय परिषदेचं उद्घाटन झालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, डीजीपी आणि आयजीपी परिषद देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या आव्हानांचे निराकरण करण्यासाठी प्रमुख व्यासपीठ म्हणून उदयास आलं आहे असे गौरवोद्गार यावेळी बोलताना शहा यांनी काढले. पुढील परिषदेपूर्वी देश नक्षलवादाच्या धोक्यापासून पूर्णपणे मुक्त होईल अशी ग्वाही शाह यांनी दिली.

**<u>नक्षलवादी शरण-गोंदिया</u>**

महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड विशेष क्षेत्रीय समितीचा प्रवक्ता माओवादी अनंत यानं शरणागतीसाठी 1 जानेवारी 2026 ची मुदत मागितली होती. मात्र त्यापूर्वीच त्यानं दरेकसा दलमच्या इतर 10 जहाल नक्षलवाद्यांसह गोंदिया पोलिसांकडे शरणागती पत्करली. यामुळं नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे. यावेळी पोलिसांनी

नक्षलवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त केला आहे. या सर्व नक्षलवाद्यांवर सरकारनं 89 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**राष्ट्रपती**

युवक हे देशाच्या भविष्याचे शिल्पकार, महान सांस्कृतिक आणि नागरी परंपरांचे रक्षक आहेत असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल काढले. लखनौ इथं स्काऊट्स आणि गाइड्स हिरक महोत्सवाच्या समारोप सोहळ्याला संबोधित करताना त्या बोलत होत्या. स्काऊट्स आणि गाइड्स युवकांना मार्गदर्शन करत आहेत आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रेरणा देत आहेत. 2047 पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी देशाची युवाशक्ती महत्वाची भुमिका बजावेल असंही त्या म्हणाल्या

**IMO**

2026-27 साठी आंतरराष्ट्रीय सागरी संघटना अर्थात IMO च्या परिषदेवर भारताची सर्वाधिक मतांसह पुन्हा निवड झाली आहे. काल लंडन इथं झालेल्या IMO असेम्ब्लीच्या 34 व्या सत्रादरम्यान परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारात सर्वाधिक हितसंबंध असलेल्या दहा देशांच्या श्रेणीमध्ये भारताला सर्वाधिक म्हणजे 169 वैध मतांपैकी 154 मते मिळाली. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त केला. हा भारताच्या सागरी क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं त्यांनी म्हंटलं आहे. भारताला मिळालेली सर्वाधिक मतं ही जागतिक सागरी वाहतूक क्षेत्रामध्ये भारताच्या रचनात्मक नेतृत्वावर आंतरराष्ट्रीय समुदायाचा दृढ विश्वास दर्शवत असून हा निकाल म्हणजे भारत सरकारच्या शाश्वत सुधारणा आणि सागरी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केलेल्या भविष्यकालीन उपक्रमांना सर्वमान्यता असल्याचं मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. IMO परिषदेमध्ये तीन श्रेणींमध्ये निवडून आलेले 40 सदस्य असतात आणि ते असेम्ब्लीच्या सत्रांदरम्यान आयएमओची कार्यकारी संस्था म्हणून काम करतात.

**अश्विनी वैष्णव**

जागतिक पटलावर भारत लवकरच सेमीकंडक्टर क्षेत्रातील प्रमुख देश म्हणून उदयास येईल आणि मोहालीतील सेमीकंडक्टर प्रशिक्षण प्रयोगशाळा या प्रवासातील प्रमुख केंद्र असेल असे गौरवोद्गार केंद्रिय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काढले. काल मोहालीतील SCL मध्ये सेमीकंडक्टर प्रोसेस गॅलरी आणि पारंगत सेमीकंडक्टर प्रशिक्षण प्रयोगशाळेचे उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली सेमीकंडक्टर अभियान राबवण्यात येत आहे, पंजाबमधील या प्रकल्पात चार हजार पाचशे कोटी रुपयांची गुंतवणुक झाली आहे. सध्याच्या उत्पन्नाच्या शेकडोपट जास्त उत्पादनवाढीसाठी नवीन संशोधन आणि आधुनिक तंत्रकुशल मनुष्यबळ निर्मितीला चालना दिली जाईल अशी माहितीही त्यांनी दिली.

**इफ्फी**

56व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची अर्थात इफ्फीची काल गोव्यात दिमाखदार सोहोळ्यानं सांगता झाली. 'अ यूजफुल घोस्ट' हा समारोपाचा चित्रपट दाखवण्यात आला. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन, सचिव संजय जाजू, महोत्सवाचे संचालक शेखर कपूर यांच्यासह विविध मान्यवर आणि मनोरंजन क्षेत्रातले कलाकार या समारोप सोहळ्याला उपस्थित होते. प्रसिद्ध अभिनेते रजनीकांत यांच्या चित्रपटसृष्टीतल्या कारकीर्दीला 50 वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्तानं इफ्फीच्या समारोप समारंभात रजनीकांत यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यंदाच्या इफ्फीमध्ये पहिल्यांदाच 50 महिला दिग्दर्शकांच्या चित्रपटांचं प्रदर्शन

झालं, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी सांगितलं. यंदाचा सुवर्ण मयूर पुरस्कार दिग्दर्शक ऍश्ले मेफेअर यांच्या 'स्किन ऑफ युथ' या व्हिएतनामी चित्रपटाला देण्यात आला. दिग्दर्शनासाठीचा रजत मयूर पुरस्कार 'गोंधळ' या मराठी चित्रपटासाठी संतोष डावखर यांना देण्यात आला.

**ट्रम्प**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जोहान्सबर्ग जी वीस शिखर परिषदेत अमेरिकेच्या अनुपस्थितीचे कारण हे दक्षिण आफ्रिकेतील कथित मानवी हक्कांचं उल्लंघन असल्याचं समाज माध्यमांवरील एका पोस्टमध्ये म्हंटलं आहे. 2026 मध्ये अमेरिकेतील मियामी येथे होणाऱ्या जी वीस शिखर परिषदेत दक्षिण आफ्रिकेला आमंत्रित केले जाणार नसल्याचंही ट्रम्प यांनी पुढे म्हंटलं आहे.दक्षिण आफ्रिकेचं सरकार श्वेत अल्पसंख्याक समुदायांना प्रभावित करणाऱ्या मानवी हक्कांच्या गंभीर उल्लंघनांबद्दल उदासीन असल्याचा उल्लेख ट्रम्प यांनी केला असून दक्षिण आफ्रिकेला दिलं जाणारं सर्व अनुदान वॉशिंग्टनकडून तात्काळ थांबवण्यात येईल असं आपल्या पोस्ट मध्ये त्यांनी म्हंटलं आहे.

**पुरुष कनिष्ठ हॉकी**

चेन्नईतील महापौर राधाकृष्णन स्टेडियमवर पुरुषांच्या एफआयएच हॉकी कनिष्ठ विश्वचषक 2025 स्पर्धेत ब गटात भारतानं पहिल्या सामन्यात काल चिलीवर 7-0 असा दणदणीत विजय मिळवला. भारतासह गतविजेत्या जर्मनी, अर्जेंटिना आणि बेल्जियमनं आपल्या मोहिमेची सुरुवात विजयानं केली. 21 वर्षांखालील ही स्पर्धा चेन्नई आणि मदुराई या दोन शहरांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. भारतानं या स्पर्धेसाठी 18 खेळाडूंच्या संघाची घोषणा केली असून बचावपटू रोहित संघाचा कर्णधार आहे. दोन वेळा ऑलिंपिक कांस्यपदक विजेता पीआर श्रीजेश हे भारतीय कनिष्ठ हॉकी संघाचे प्रशिक्षक आहेत. भारताचा गट ब मध्ये चिली, ओमान आणि स्वित्झर्लंडसह समावेश आहे. भारताने यापूर्वी ही स्पर्धा दोनदा जिंकली आहे.

महत्वाच्या इतर सामन्यात जर्मनीनं दक्षिण आफ्रिकेचा 4-0, आयर्लंडनं कॅनडाचा 4-3, स्वित्झर्लंडनं ओमानचा 4-0, अर्जेंटिनानं जपानचा 4-1, तर न्यूझीलंडनं चीनचा 5-3 असा पराभव केला. या वर्षी 24 संघांच्या समावेशामुळं ही स्पर्धा आतापर्यंतची सर्वात मोठी पुरुष कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धा ठरली आहे. या संघांना चार गटात विभागलं असून राउंड-रॉबिन स्वरूपात प्राथमिक फेरीचे सामने होतील. प्रत्येक गटातील विजेत्या संघांमध्ये उपांत्यपूर्व फेरीच्या लढती होतील.

**हवामान**

चक्रीवादळ दितवा हे श्रीलंकेच्या किनाऱ्यावरून वायव्येकडे सरकण्याची शक्यता असून उद्या पहाटेपर्यंत उत्तर तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि लगतच्या दक्षिण आंध्र प्रदेश किनाऱ्याजवळील नैऋत्य बंगालच्या उपसागरावर पोहोचण्याची शक्यता असल्याचं भारतीय हवामान विभागानं  म्हंटलं आहे. चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर, मच्छिमारांना परवा अर्थात 1 डिसेंबरपर्यंत तामिळनाडू, पुद्दुचेरी, दक्षिण आंध्र प्रदेश आणि श्रीलंकेच्या किनाऱ्यावरील भागात जाऊ नये असा सल्ला देण्यात आला आहे. तमिलनाडु, पुद्दुचेरी आणि कराइक्कल इथं उद्या मुसळधार पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**